सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त मुख्य इमारतीला रोषणाई करण्यात आली आहे. शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर अभिवादन करण्यासाठी एकत्र आलेली तरुणाई. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

अर्जुन टाकळकर



## विद्यापीठ झळाळले

शिवाजी विद्यापीठाचा शुक्रवारी होणारा दीक्षांत समारंभ आणि शिवजयंतीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यामुळे शिवरायांच्या पुतळ्यासह विद्यापीठाची इमारत झळाळून गेली आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठ उजळले



आदित्य वेल्हाळ

शिवजयंती आणि तीन दिवसांवर येऊन ठेपलेल्या दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

Kolhapur Main
Page No. 2 Feb 20, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी शिवजयंती उत्साहात साजरी केली. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन केले. शिवपुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

शिवजयंतीनिमित्त विद्यापीठाच्या प्रांगणात रांगोळी घालण्यात आली होती. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी झांजपथकासह विद्यापीठ परिसरात प्रभातफेरी काढली. विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरून आणलेल्या शिवज्योतचे स्वागत केले. शिवाजी महाराज यांच्या जयघोषासह लेझीम, ढोल-ताश्यांच्या गजरात विद्यापीठ परिसर दणाणून गेला.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, इनोव्हेशन व इनक्युबेशन कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विद्यार्थी, शिवप्रेमी उपस्थित होते.

Hello Kolhapur
Page No. 3 Feb 20, 2019
Powered by: erelego.com

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे प्रभातफेरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात शिवजयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शिवजयंतीनिमित्त विद्यापीठाच्या प्रांगणात रांगोळी घालण्यात आली होती.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी झांजपथकासह विद्यापीठ परिसरात प्रभातफेरी काढली. विद्यार्थ्यांनी पन्हाळगडावरून आणलेल्या शिवज्योतीचे स्वागत करण्यात आले. शिवाजी महाराजांच्या जयघोषासह लेझीम, ढोल-ताश्यांच्या गजरात विद्यापीठ परिसर दणाणून गेला होता.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, इनोव्हेशन व इनक्युबेशन कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड आदी उपस्थित होते.

20 FEB 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी

## राज्यपाल चे. विद्यासागर राव समारंभाच्या अध्यक्षस्थानी : विविध १९ समित्यांची नियुक्ती

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभ शुक्रवार २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता होणार आहे. प्रमुख पाहुणे तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भिमराया मेत्री प्रमुख पाहुणे आहेत. कुलपती तथा महामहीम राज्यपाल चे. विद्यासागर राव अध्यक्षस्थानी आहेत. दरम्यान राज्यपालांच्या हस्ते रसायनशास्त्र नवीन इमारत व मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे उद्‌घाटन करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. सध्या विद्यापीठ परिसरात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी सर्वसाधारण १९ समित्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मिरवणूक, पदवी प्रमाणपत्र वितरण, पाहुण्यांचा चहा–अल्पोहार, बैठक व्यवस्था, लाईट व्यवस्था, स्वागत समिती, संकेतस्थळावर ऑनलाईन थेट प्रक्षेपण, ग्रंथमहोत्सव, ग्रंथदींडी आदी समित्यांचा समावेश आहे. या सोहळयाची तयारी अंतिम टप्यात आली असून पदवी प्रमाणपत्रे छपाईचे कामकाज सुरू आहे.

यंदा महाविद्यालयांना जिल्हा निहाय पदवी प्रमाणपत्रांची वितरण व्यवस्था केली आहे. वाहनांची पार्कींग व्यवस्था व मंडपाचे काम सध्या सुरू आहे.

दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल येणार असल्याने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. राज्यपालांच्या प्रोटोकॉलनुसार पूर्ण दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम होईल, आहे.

### यंदा ४५ हजार स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे

शिवाजी विद्यापीठात यंदा प्रत्यक्ष २४ हजार विद्यार्थ्यांना व पोस्टाने २५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यंदा ज्या विद्यार्थ्यांनी पोस्टाने पदवी प्रमाणपत्र मागवली आहेत, त्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ प्रशासन पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठवणार आहे. तसेच पीएच. डी. पदवी पैकी फॅकल्टी ऑफ आर्ट ॲन्ड फायनल आर्ट, सोशल सायन्स, विज्ञान विभाग, कॉमर्स विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, अभियांत्रिकी आदी विभागातील जवळपास ५५ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर प्रदान केली जाणार आहेत.